08-03-2024-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 3/7/2024 11:31 PM Page 1



रस्त्याकडेची भंगारअवस्थेतील वाहने हटविणार ! पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



अश्विन, कुलदीपने इंग्लंडला गुंडाळले, रोहित, यशस्वीचे अर्धशतक पान ८ वर

वेर्णा, शुक्रवार, ८ मार्च २०२४ | पाने ८ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 12, Issue 187 | Verna, | facebook.com/dainikherald Friday 8 March, 2024 | Pages 8 | ₹ 4

## आजचे संपादकीय

नाणं खणखणीत कधी वाजणार ?

–पान ४

## निवडक

### चीनमध्ये भूकंप

**किंघाई, दि. ७ :**

चीनमधील किंघाई शहरात भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाची तीव्रता ५ रिश्टर स्केल इतकी नोंदली गेली होती. दुपारी ३ वाजून ३५ मिनिटांनी हे भूकंपाचे धक्के बसले, याचा केंद्रबिंदू १८० किमी खोलीवर होता. भूकंपाची तीव्रता जरी अधिक असली तरी अद्याप कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही.

### बंगळुरूत पाणीबाणी

**बंगळूरू, दि. ७ :**

भारताची आयटी सिटी म्हणून जगभर बोलबाला असलेल्या बंगळुरू शहरात भीषण पाणीटंचाई निर्माण झालेली आहे. मुख्यमंत्री सिद्धारमैया यांच्या निवासस्थानी टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. तर उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या बंगल्यातील बोअरलाही पाणी बंद झाले आहे.

### एसबीआयविरुद्ध अवमान याचिका

**नवी दिल्ली, दि. ७ :**

१५ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने राजकीय निधीसाठी इलेक्टोरल बाँड योजनेवर बंदी घातली होती. तसेच, स्टेट बँक ऑफ इंडियाला निवडणूक आयोगाला इलेक्टोरल बाँड्सची माहिती देण्यासाठी ६ मार्च २०२४ पर्यंत वेळ देण्यात आला होता. आज, जेव्हा एसबीआयने ७ मार्चपर्यंत माहिती सार्वजनिक केली नाही, तेव्हा असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने एसबीआयविरोधात सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली आहे.

### कोर्टाचे केजरीवाल यांना समन्स

**नवी दिल्ली, दि. ७ :**

दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने गुरुवारी (दि.७) मद्य धोरण घोटाळ्याशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना समन्स पाठवले आहे. अनेक समन्सकडे दुर्लक्ष केल्याबद्दल ईडीने बुधवारी (६ मार्च) केजरीवाल यांच्याविरोधात न्यायालयात खटला दाखल करण्याची मागणी केली होती. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी दिव्या मल्होत्रा यांनी केजरीवाल यांना १६ मार्च रोजी न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

### हवामान

कमाल : ३० किमान : २४
आर्द्रता : ८९

### बाजार भाव

सोने : ₹ ६४,९३० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ७४,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७४,११९.३९ ↑ (३३.४०)
निफ्टी : २२,४९३.५५ ↑ (१९.५०)

# एसटी समाजाला राजकीय आरक्षण देण्यासंबंधी कायदा करणार

**विधेयकाच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी | मात्र आरक्षणाच्या अधिसूचनेवर एसटी समाजाचे नेते ठाम**

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ७ : गोव्यातल्या अनुसूचित जमातींना राजकीय आरक्षण मिळण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाची दखल अखेर केंद्र सरकारला घ्यावी लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने संसदेत गोवा राज्याच्या विधानसभा मतदारसंघात अनुसूचित जमातींच्या प्रतिनिधीत्वाच्या पुनर्रचना विधेयक, २०२४ सादर करण्याच्या कायदा आणि न्याय मंत्रालयाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मात्र, केवळ विधेयक सादर करण्याच्या प्रस्तावाला मंजूरी म्हणजे राजकीय आरक्षणाची अधिसूचना नाही, असे सांगत एसटी समाजाने आपले आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे.**

गोवा राज्यातील अनुसूचित जमातींच्या घटनात्मक अधिकारांचे रक्षण होण्यासाठी, संसदीय आणि विधानसभा मतदारसंघाच्या परिसीमन आदेश, २००८ मध्ये सुधारणा करण्यासाठी निवडणूक आयोगाला अधिकार देणाऱ्या तरतुदी सक्षम करण्यासाठी कायदा करणे आवश्यक आहे, असा न्याय आणि कायदा मंत्रालयाचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळासमोर आला असता या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. यानंतर या प्रस्तावानुसार अनुसूचित जमातींच्या राजकीय आरक्षणाचा कायदा झाल्यानंतरच हे आरक्षण प्रत्यक्षात येणार आहे. मात्र, हा कायदा संसदेच्या अधिवेशनातच होणार असल्यामुळे या सगळ्या प्रक्रियेला वेळ लागणार आहे. यामुळे फक्त कॅबिनेटमध्ये प्रस्तावाला मंजूरी म्हणजे अधिसूचना नसून जोपर्यंत राजकीय आरक्षणाची अधिसूचना सरकार काढत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याची भूमिका एसटी समाजाच्या नेत्यांनी घेतली आहे.

> मंत्रिमंडळाचा हा निर्णय म्हणजे पुन्हा शून्यापासून सुरुवात आहे. न्याय आणि कायदा विभागाचा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर कायदा मंजूर होणे आणि त्यानंतर त्या कायद्यानुसार
> निवडणूक आयोगाला अधिकार मिळणे त्यानंतर परिसीमन होणे आणि त्यानंतर मंतदारसंघ आरक्षित होणे यात तीन वर्षापेक्षा जास्त काळ लागू शकतो. आम्हाला आता गाजर नको, आम्हाला अधिसूचना हवी. या निर्णयावर आम्ही समाधानी नाही. आमची भूमिका आम्ही लवकरच स्पष्ट करू
> – सोयरू वेळीप, समन्वयक, गाकुवेध

### प्रस्तावित विधेयकाची ठळक वैशिष्ट्ये :

(i) जनगणना २००१ च्या प्रकाशनानंतर ज्या जमातींना अनुसूचित जमाती म्हणून घोषित करण्यात आले आहे त्यांची लोकसंख्या विचारात घेऊन गोवा राज्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या निश्चित करण्याचे आणि निश्चित करण्याचे ते जनगणना आयुक्तांना अधिकार देते. जनगणना आयुक्त भारताच्या राजपत्रात निश्चित केल्यानुसार आणि निर्धारित केल्यानुसार विविध लोकसंख्येचे आकडे सूचित केले जातील आणि त्यानंतर, अशा लोकसंख्येचे आकडे अंतिम आकडे मानले जातील आणि अनुसूचित जमातींना अनुसूचित जमातींना आनुपातिक प्रतिनिधित्व देण्याच्या उद्देशाने अनुसूचित जमातीच्या अनुच्छेद ३३२ मध्ये प्रदान केलेल्या सर्व आधी प्रकाशित आकड्यांना मागे टाकले जाईल. संविधान;

(ii) गोवा विधानसभेत अनुसूचित जमातींना विधानसभेतील मतदारसंघांचे पुनर्संयोजन करून योग्य प्रतिनिधित्व देण्याच्या उद्देशाने संसदीय आणि विधानसभा मतदारसंघांचे परिसीमन आदेश, २००८ मध्ये आवश्यक सुधारणा करण्याचा तो निवडणूक आयोगाला अधिकार देतो;

(iii) निवडणूक आयोग अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची सुधारित आकडेवारी विचारात घेईल आणि संविधानाच्या कलम १७० आणि ३३२ आणि परिसीमन कायदा, २००२ च्या कलम ८ मधील तरतुदींचा विचार करून विधानसभा मतदारसंघ पुनर्संचयित करेल;

(iv) विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचना करण्याच्या हेतूने, भारताचा निवडणूक आयोग स्वतःची कार्यपद्धती निश्चित करेल आणि त्याला दिवाणी न्यायालयाचे काही अधिकार असतील;

(v) ते भारताच्या निवडणूक आयोगाला सीमांकन आदेशामध्ये केलेल्या सुधारणा आणि त्याच्या कामकाजाच्या तारखा राजपत्रात प्रकाशित करण्याचा अधिकार देखील देते. सुधारित परिसीमन आदेश विद्यमान विधानसभेच्या घटनेवर विसर्जन होईपर्यंत परिणाम करणार नाही;

(vi) प्रस्तावित विधेयक निवडणूक आयोगाला उक्त परिसीमन आदेशातील त्रुटी आवश्यक दुरुस्त करण्याचे अधिकार देते.

## सांतीनेज नाल्याजवळील झाडांची तोड..!



सांतीनेज : गावणेकर हॉस्पिटलनजीक सांतीनेज नाल्याच्या काठावर असलेली झाडे तोडून नाल्यात टाकण्यात आलेली आहेत. (सगुण गावडे)

## शेतकरी नेत्यांना न्यायालयाने फटकारले

**चंदीगड, दि. ७ :**

पंजाब–हरियाणाच्या शंभू आणि खनौरी सीमेवर सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनावर पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने जोरदार टीका केली आहे. शेतकरी नेते बलबीर राजेवाल आणि इतरांनी दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालय म्हटले की, शेतकरी आंदोलनात मुलांना पुढे केले जात आहे. लहान मुलांच्या नावाखाली शस्त्रे घेऊन निदर्शने केली जात आहेत, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. पालक कसे आहेत? पान २ ▶

## बनावट दाखल्यांद्वारे विवाह नोंदणी

- जिल्हा निबंधकांनी नोंदवली फातोर्डा पोलिस ठाण्यात तक्रार
- मोठे रॅकेट असल्याचा संशय

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ७ :** बनावट कागदपत्रे, रहिवासी दाखल्यांद्वारे विवाह नोंदणी केली जात असल्याची तक्रार खुद्द जिल्हा निबंधकांनीच फातोर्डा पोलिस ठाण्यात नोंदवली असून, याप्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी फातोर्डा पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या तक्रारीतून केली आहे. दलालांच्या माध्यमातून मोठी रक्कम वसूल करून हे दाखले दिले जात असल्याची माहिती पुढे येत असून, याप्रकरणी सविस्तर चौकशी करण्याची मागणी निबंधकांनी फातोर्डा पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या तक्रारीतून केली आहे. याप्रकरणाची सखोल चौकशी केल्यास एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकाच अनुक्रमांकाचे ४ निवासी दाखले सापडले आहेत. एका दाखल्यावर बदली झालेल्या मामलेदाराची स्वाक्षरी पान २ ▶

# ‘स्पीड गव्हर्नर’ बसवण्यासाठी ७ एप्रिलची अंतिम मुदत

- नाही बसवले तर वाहतूक परवाने रद्द करणार
- वाहतूक मंत्र्यांचा रेंट–ए–कॅब आणि टॅक्सी ऑपरेटर्सना कडक इशारा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ७ :** राज्यातल्या सर्व रेंट–ए–कॅब आणि टॅक्सी ऑपरेटर्सना ७ एप्रिलपूर्वी स्पीड गव्हर्नर बसवायलाच लागतील अन्यथा त्यांचे वाहतूक परवाने रद्द केले जातील, असे आदेश वाहतूक विभागाने काढले आहेत. स्पीड गव्हर्नर बसवण्याबाबत रेंट–ए–कॅब आणि टॅक्सी ऑपरेटर्सनी आक्षेप घेत दोन दिवसांपूर्वी वाहतूक विभागच्या संचालकांची भेट घेतली होती. टॅक्सी ऑपरेटर्सना राज्यातल्या किंवा राज्याबाहेरच्या कोणत्याही डिलरकडून हे स्पीड गव्हर्नर खरेदी करण्याची मुभाही या आदेशांनुसार देण्यात आली आहे.

याबाबत वाहतूकमंत्री माविन गुदिन्हों म्हणाले की, आजपासून त्यांना एक महिन्याची वेळ दिली जात आहे. तुमच्याकडे काम करणारे स्पीड गव्हर्नर असले पाहिजेत. जर तुम्ही पूर्वी स्पीड गव्हर्नर बसवले असतील. पण ते काम करत नसतील, तर हे मान्य केले जाणार नाही. आजपासून एक महिना संपल्यानंतर कडक अंमलबजावणी होणार आहे. वाहने कायद्याचे गंभीर उल्लंघन करताना आढळल्यास वाहने जप्त केली जातील आणि परमिट रद्द केले जातील. तथापि, मंत्र्यांनी मान्य केले की बाजारात पुरेसे स्पीड गव्हर्नर उपलब्ध नाहीत आणि डीलर्स ग्राहकांचे शोषण करतात आणि सुमारे २००० रुपयांना उपलब्ध असलेल्या डिव्हाइससाठी १० हजार ते १५ हजार रुपये आकारतात. त्यामुळे वाहनमालकांना राज्याबाहेरील विक्रेत्यांसह त्यांच्या आवडीच्या कोणत्याही डिलरकडून स्पीड गव्हर्नर खरेदी करण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल. मात्र, जादा दर आकारणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार वाहतूक विभगाला नाहीत, असेही वाहतूक मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

रेंट–ए–कॅबच्या नव्या नियमांनुसार वाहतूक विभागाची परवानगी घेतल्याशिवाय लोकांना त्यांची वाहने व्यावसायिक कारणांसाठी भाड्याने देता येणार नाहीत. याबाबत लवकरात लवकर टुरिस्ट टॅक्सीचे ऑडिट केले जाणार असून गोव्यात किती टॅक्सी आहेत, जे रेंट–ए–कार आहेत त्यातल्या किती परवानाधारक आहेत, गोव्यातील सर्व परवानग्या किती आहेत, किती परवानाधारकांकडून एसओपीचे उल्लंघन केले जात आहे याबाबतची सर्व माहिती अद्ययावत केली जाणार असून नियम मोडणाऱ्या टॅक्सी ऑपरेटर्स वर कडक कारवाई केली पान २ ▶




# मंत्रिमंडळात महिलांना स्थान कधी ?

**परीकर, राणे, कामत सरकार देखील महिलांना प्रतिनिधित्व देण्यात उदासीन होते**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ७ :** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी दक्षिण गोव्यात भाजपकडून महिला उमेदवारांचा शोध सुरू असला तरी भाजपने आत्तापर्यंत निवडून येण्याची क्षमता असणाऱ्यांनाच उमेदवारी दिली आहे. पूर्वीच्या गोवा दमण आणि दीवमध्ये १९८४ मध्ये तीन महिलांना आमदार म्हणून नामांकन देण्यात आले होते. आज राज्याच्या विधानसभेत भाजपचे तीन महिला आमदार असले तरी गोव्याचा समावेश १० टक्क्यांपेक्षा कमी महिला आमदार असलेल्या १९ राज्यांमध्ये होतो.

गोव्याला राज्याचा दर्जा मिळाल्यानंतर १९८९ नंतर २००० पर्यंत गोव्यात एकच महिला आमदार होत्या. २००० आणि २००२ मध्ये मनोहर पर्रीकर यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात, २००५ ते २००७ मध्ये राणे मंत्रालय आणि २००७ ते २०१२ मध्ये दिगंबर कामत यांच्या मंत्रिमंडळात महिला सदस्यांना प्रतिनिधित्व नव्हते. २०१२ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने प्रथमच साधे बहुमत मिळवले, परंतु पक्षाने एकही महिला उमेदवार उभा केला नाही, कारण निवडून येण्याच्या क्षमतेचा निकष. परंतु पर्रीकरांच्या तिसऱ्या कार्यकाळात, पती मथानी यांच्या निधनामुळे आवश्यक पोटनिवडणूक जिंकल्यानंतर एलिना साल्ढाणा यांना कॅबिनेट मंत्री म्हणून समाविष्ट करण्यात आले. २०१७ च्या निवडणुकीत, आम आदमी पार्टीने महिला उमेदवारांना सर्वाधिक पाच तिकिटे दिली, त्यानंतर काँग्रेस पक्षाने तीन तिकिटे दिली. अलिना साल्ढाणा (भाजप) आणि जेनिफर मॉन्सेरेत (काँग्रेस) या दोनच महिला निवडून आल्या. एलिना यांचा मंत्री म्हणून समावेश करण्यात आला. भाजपकडे आता तीन आमदार असले तरी त्यापैकी एकाचाही मंत्रिमंडळात समावेश करण्यात आलेला नाही. भाजपने राज्यभरात नारीशक्ती कार्यक्रम करून महिलांचे मेळावे घेतले, पण मंत्रिमंडळात मात्र एकाही महिलेला स्थान दिलेले नाही यावरून विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी भाजपवर टीका केली आहे.

महिला दिन विशेष

